पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१८५/२०१६
दिनांक : ०१/०४/२०१६

प्रति,

मा.......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा दिनांक **०५/०४/२०१६** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **०५/०४/२०१६** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १३**

दिनांक : **०५/०४/२०१६** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **०५/०४/२०१६** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

---------

दिनांक ०१/०३/२०१६ व १५/०३/२०१६ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १२)** सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या महाराष्ट्र शासन, नवनगर विकास विभाग अधिसुचना क्र.पीएस-१८९३/१४१२/युडी-१३, दिनांक २८ नोव्हेंबर १९९५ अन्वये मंजूर विकास आराखडयात तथापि महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग अधिसुचना क्र.पीसीएन-१६९७/९३४/प्र.क्र.८९/नवि-२२, मंत्रालय, मुंबई, दिनांक १५ नोव्हेंबर १९९७ अन्वये मंजूर विकास आराखडयात मौजे भोसरी येथील स.नं.१५ पै. व स.नं.१४ पै. मधील २४.० मी. रुंद रस्ता व १२.० मी. रस्ता प्रस्तावित आहे. मौजे भोसरी येथील नागरिकांची दळणवळणाची गैरसोय होत असल्याने व वाहतुकीच्यादृष्टीने स.नं.१५ पै. व १४ पै.मिळकतीमधील मंजूर विकास योजनेतील २४.० मी. (स.नं.१५ पै.) व १२.० मी. (स.नं.१४ पै.) रुंद रस्ता विकसित करणे आवश्यक आहे. रस्त्याने बाधित क्षेत्र हे खाजगी मिळकतधारकाचे असल्याने भूसंपादन करणे आवश्यक असल्याने " पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी.हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व १४ पै. मधील २४ व १२ मी. रुंद (पुर्व-पश्चिम) रस्त्याचे क्षेत्र भूसंपादन अधिनियमान्वये संपादन करणेकामी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरीता व सदर भूसंपादनास येणा-या खर्चास मान्यता देणेस व खर्च रक्कम अदा करणेकामी

मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**( दिनांक ०५/०४/२०१६ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )**

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील ड क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्य क्षेत्रातील मौजे वाकड येथील स.नं. २१० मध्ये पार्क स्ट्रीट हा गृहप्रकल्प आहे. सदर गृहप्रकल्पात औंध- रावेत हा पोहोच रस्ता आहे. सदर गृहप्रकल्पाचे पाठीमागील बाजूने नाशिक फाटा ते वाकड मुंबई बेंगलोर हायवे हा रस्ता आहे. सदरच्या रस्त्यापर्यंत पोहोच रस्ता आवश्यक आहे. सदरचा नाशिक फाटा ते वाकड मुंबई बेंगलोर हायवे रस्ता व पार्क स्ट्रीट या गृहप्रकल्पा दरम्यान पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे पिंपळे निलख स.नं. २७ मधील आरक्षण क्र. ३८७ उद्यान आरक्षण आहे. सदरचे उद्यानचे आरक्षण भागश: विकसित झालेले आहे.

मा.ड प्रभाग समिती मध्ये ठराव क्र. ५६ दिनांक – १३/०३/२०१५ नुसार खालीलप्रमाणे ठराव मंजूर झालेला आहे.प्रभाग क्र. -५४ पिंपळे निलख प्रभागातील मौजे वाकड येथील स.नं २१० रहिवासी विभागातील मिळकतधारकांसाठी रस्त्याची आवश्यकता असल्याने महापालिकेच्या मंजूर आराखड्यातील ४५.०० मी डी.पी.रस्त्यापर्यंत मौजे पिंपळे निलख येथील स.नं. २७ मधून १८.०० मी रुंद रस्ता हा मौजे वाकड येथील स.नं. २१० मधून ४५ मी. रस्त्यापर्यंत मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये १८.०० मी नॉन डी.पी. रस्ता घोषित करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला आहे.”

मा. आयुक्तसो. यांचेकडील दि. ०९/०९/२००४ चे कार्यालयीन मंजूर टिपणी अन्वये कलम २०५ खालील सर्व कार्यवाही प्रभागामार्फत करण्यात येते. ही कार्यवाही म्हणजे नविन रस्ते करण्यासाठी ठराव मंजूर करणे. त्यानंतर नगररचना विभागाकडून नविन प्रस्तावित रस्त्याबाबत वर्तमानपत्रात जाहीरात देऊन लोकांकडून । सुचना।हरकत मागविण्यात येतात जर सुचना।हरकती आल्या तर त्यावर सुनावणी घेऊन मा. आयुक्तसो यांची अंतिम मंजुरी घेण्यात येते. त्यानुसार सदरचा ठराव मंजूर झालेला आहे.

सदर ठिकाणी या विभागाने साईट व्हीजीट केली असता, उपरोक्त मंजूर ठरावानुसार सदर ठिकाणी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये १८.०० मी नॉन डी.पी. रस्ता घोषित करावयाचा झाल्यास आरक्षण क्र. ३८७ च्या पश्चिम बाजूकडील ऐश्वर्यम या गृहप्रकल्पाच्या शेजारील व पिं.चिं.मनपाच्या आरक्षण क्र. ३८७ मधील अंदाजे २६०.९३ चौ.मी. जागा प्रस्तावित रस्त्याने बाधित होईल.त्याबदल्यात उद्यानास लागून अंदाजे २६१.०० चौ.मी. क्षेत्र रामा को-ऑफ हौ.सो.वाकड ही मनपास देणेस तयार आहे. (सोबत अवलोकनार्थ नकाशा जोडला आहे. कृपया अवलोकन व्हावे.) तसेच सदर ठिकाणी मनपाने सिमाभिंतीचे काम पुर्ण केलेले आहे. मनपाचे ताब्यात द्यावयाचे क्षेत्र

सिमाभिंतीच्या बाहेर असून सदरची वाढीव सिमाभिंतही बांधून देणेस रामा को-ऑफ हौ.सो.वाकड तयार असलेबाबत मनपास कळविले आहे.बांधकाम परवानगी विभागाकडील मंजूर आराखड्यातील २६१.०० चौ.मी. क्षेत्र अर्जदार मनपाचे ताब्यात देणार आहेत.तरी सदर क्षेत्राचा चटई क्षेत्र निर्देशांकातून वगळणेत यावेत.सदरबाबत अर्जदार यांनी दिनांक – २४/०९/२०१५ चे हमीपत्रान्वये एफएसआय/टीडीआर अथवा इतर कोणताही मोबदला पिं.चिं.मनपाकडे मागणार नाही असे हमीपत्र सादर केलेले आहे. तसेच सदर क्षेत्रास मनपाचे नांव ७/१२ उता-यावर लावण्यात यावे या अटीवर मान्यता देण्यास हरकत नाही.

सदरचा रस्त्याचा उपयोग पार्क स्ट्रीट या गृहप्रकल्पाबरोबर ऐश्वर्यम या गृहप्रकल्पाच्या पाठीमागील मिळकतधारकांसाठी सुध्दा होईल. तसेच सदरबाबत मा. ड प्रभाग समितीनेही १३/३/२०१५ रोजी ठराव मंजूर केलेला आहे.सदरचा प्रस्ताव मान्य झालेनंतर मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २०५ अंतर्गत मनपा रस्ता घोषित करणेबाबतची पुढील कार्यवाही करीता हरकती/सुचना मागविणेत येतील.

अर्जदार यांचे निवासी भागातील २६१.०० चौ.मी. क्षेत्र मनपाचे ताब्यात घेऊन त्याचे १८.०० मी.रस्त्यासाठी मनपाकडून आरक्षण क्र. ३८७ मधील अंदाजे २६०.९३ चौ.मी. जागा अदलाबदल करणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१८५/२०१६
दिनांक : ०१/०४/२०१६ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.